जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

09 MAR 2026
तरूण भारत

# कायदे पालनातूनच मानवी कल्याण

■ प्राचार्य डॉ. टी. एम. पाटील

प्रतिनिधी
गगनबावडा

नियम आणि कायद्यांच्या पालनातूनच मानवी कल्याण साधता येते, विधी नियम आणि सामाजिक संहिता या व्यक्ती विकासाला पूरक ठरतात, असे मत प्राचार्य डॉ. टी. एम. पाटील यांनी व्यक्त केले.

येथील अग्रणी महाविद्यालय व शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कायदा निर्मितीची प्रक्रिया कार्यशाळेत ते बोलत होते.

ते म्हणाले, मानवी समूह निर्मितीपासून समूह संहितेच्या पालनाची सुरुवात झाली. काल परत्वे त्यात बदल होत जाऊन नवनवीन विधी नियम तयार होऊ लागले. ते मानवी जीवनात सकारात्मक बदल घडण्यास कारणीभूत ठरले.



गगनबावडा : येथील महाविद्यालयात आयोजित कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी प्राचार्य डॉ. टी. एम. पाटील, मान्यवर.

ॲड. मल्लिकार्जुन खंदारे यांनी, मानवी जीवनात कायद्याचे महत्त्व विषद करताना मानवाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आणि अडचणी सोडवण्यासाठी कायदा महत्त्वाची भूमिका बजावतो. कायदे पालनामुळे समाज एकरूप होण्यास मदत होत.

ॲड. व्ही. पी. गुरव यांनी, कायद्याचा उगम व विकास यावर बोलताना, स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे. अमर्याद वर्तनावर बंधन घालून सुसंस्कृत समाज निर्मितीसाठी कायद्याचा उगम झाला. तो निरंतर विकसित होत आहे. उपक्रमास आनंदी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. सतीश देसाई व सचिव प्रा. डॉ. विद्या देसाई यांचे सहकार्य लाभले. संविधानाच्या प्रास्ताविकेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. प्रास्ताविक प्रा. ए. आर. गावकर यांनी केले. तज्ज्ञांची ओळख डॉ. एस. एस. पानारी यांनी करून दिली. सूत्रसंचालन वंदना पाटील यांनी केले. डॉ. ए. एस. कांबळे यांनी आभार मानले.

09 MAR 2026

पुढारी

## दैनंदिनी

● **कार्यशाळा :** शिवाजी विद्यापीठातर्फे आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त कार्यशाळा. **स्थळ** - राजर्षी शाहू सभागृह, शिवाजी विद्यापीठ. **वेळ** - सकाळी ११ ते दुपारी २.३० पर्यंत.

0 9 MAR 2026

जनप्रवास



# महिला दिनानिमित्त विद्यापीठात एकदिवसीय कार्यशाळा

कोल्हापूर : आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने, स्त्री अभ्यास केंद्र, लेडीज हॉस्टेल, बेटी बचाओ अभियान, अंतर्गत तक्रार समिती, श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन, शिक्षणशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने ९ मार्च २०२६ रोजी 'राईटस, जस्टिस, अँण्ड अँक्शन फॉर ऑल गर्ल्स अँण्ड वुमेन' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात सकाळी ११ ते ३ या वेळेत आयोजित करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरु प्रा. (डॉ). सुरेश गोसावी भुषविणार असुन, नॅंकचे सल्लागार (बेंगलोर) डॉ. जगन्नाथ पाटील यांचे बीजभाषण होणार आहे. यावेळी प्रभारी कुलगुरु प्रा. (डॉ). ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, यांची प्रमुख उपस्थिती आहे. 'महिलांचे हक्क, न्याय व कृति' ही यावर्षीच्या आंतरराष्ट्रीय महिला दिनाची मध्यवर्ती संकल्पना आहे. या विषयांवर डॉ. ज्योती शेटे (स्कूल ऑफ लॉ जेएसपीएम विद्यापीठ, पुणे), प्रा.(डॉ).प्रविण पाटील, (प्राचार्य, शहाजी लॉ कॉलेज, कोल्हापूर), डॉ. राधेश्याम जाधव (सहसंपादक, द हिंदू बिझनेस लाईन, पुणे), डॉ. विजय चोरमारे, (जेष्ठ संपादक, पुणे) कार्यशाळेत मार्गदर्शन करणार आहेत. ही कार्यशाळा विनामुल्य असून नोंदणी करणे आवश्यक आहे. सहभागी व्यक्तींना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. याचा लाभ घ्यावा, असे आवाहन स्त्री अभ्यास केंद्राच्या संचालक डॉ. निशा मुडे-पवार यांनी संयोजकांच्या वतीने केले आहे.

0 9 MAR 2026
तरुण भारत

# महिला दिनानिमित्त विद्यापीठात आज कार्यशाळा

**कोल्हापूर :** आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने, स्त्री अभ्यास केंद्र, लेडीज हॉस्टेल, बेटी बचाओ अभियान, अंतर्गत तक्रार समिती, श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन, शिक्षणशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार दि.९ एकदिवसिय कार्यशाळेचे आयोजन केले आहे. 'राईटस, जस्टिस, अँण्ड अँक्शन फॉर ऑल गर्ल्स अँण्ड वुमेन' या विषयावर एकदिवसीय चर्चा होणार आहे. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात सकाळी ११ ते ३ या वेळेत ही कार्यशाळा होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी कुलगुरु प्रा. डॉ. सुरेश गोसावी असणार आहेत. नॅकचे सल्लागार (बेंगलोर) डॉ. जगन्नाथ पाटील यांचे बीजभाषण होणार आहे. यावेळी प्रभारी कुलगुरु प्रा. डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, यांची प्रमुख असणार आहे.'महिलांचे हक्क, न्याय व कृती" ही यावर्षीच्या आंतरराष्ट्रीय महिला दिनाची मध्यवर्ती संकल्पना आहे. या विषयांवर स्कूल ऑफ लॉ जेएसपीएम विद्यापीठ, पुणे येथील डॉ. ज्योती शेटे, शहाजी लॉ कॉलेजचे प्राचार्य प्रा. डॉ प्रविण पाटील, सहसंपादक डॉ. राधेश्याम जाधव, ज्येष्ठ संपादक डॉ. विजय चोरमारे कार्यशाळेत मार्गदर्शन करणार आहेत. ही कार्यशाळा विनामुल्य असुन या कार्यशाळेचा लाभ घ्यावा, असे आवाहन स्त्री अभ्यास केंद्राच्या संचालक डॉ. निशा मुडे-पवार यांनी केले आहे.

0 9 MAR 2026

तरुण भारत

# लोकनेते बाळासाहेब देसाई जयंतीदिनी उद्या विद्यापीठात व्याख्यान

कोल्हापूर : लोकनेते बाळासाहेब देसाई यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठातील लोकनेते बाळासाहेब देसाई अध्यासनाच्या वतीने मंगळवार दि. १० रोजी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळी ६ वाजता व्याख्यानाला सुरूवात होणार आहे. लोकनेते बाळासाहेब देसाई एक दीपस्तंभ या विषयावर कला व वाणिज्य महाविद्यालय साताराचे निवृत्त प्राध्यापक डॉ. श्रीधर साळुंखे मार्गदर्शन करणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. भरतभुषण माळी असणार आहेत. तर डॉ. अरूण भोसले यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

0 9 MAR 2026
तरुण भारत

# 'जीवन जगण्याची कला आत्मसात करा, जिज्ञासू राहा'

कोल्हापूर :जीवन जगणे ही कला आहे. ती कला आपण आत्मसात करा. त्यासाठी आयुष्यभर जिज्ञासू राहा, असे मत माजी प्राचार्य व प्रसिद्ध वक्ते डॉ. आर. आर. कुंभार यांनी व्यक्त केले. ते रयत शिक्षण संस्थेचे राजर्षी छत्रपती शाहु कॉलेज कदमवाडी येथे महाविद्यालयाची संशोधन कमिटी आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या विशेष व्याख्यानात बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य, प्रो. डॉ. डी. आर. भोसले हे होते. माणूस हा बुद्धिमान प्राणी आहे. माणसाने आपल्या बुद्धीच्या जोरावर वाफेची इंजिन, चाक, वीज असे अद्भुत वाटावेत, असे अनेक शोध लावले आहे. जिज्ञासेला शोधाची, विज्ञानाला तंत्रज्ञानाला जोड देवून समाजाला एका उन्नत स्थितीला घेवून जावू शकतो, असे मत कार्यक्रमाचे अध्यक्ष, महविद्यालयाचे प्र. प्राचार्य, डॉ. डी. आर. भोसले त्यांनी व्यक्त केले. ह्या व्याख्यानास महाविद्यालयाच्या आयक्युएसी प्रमुख डॉ. यु. एस. शेळके, विज्ञान विभागाच्या डॉ. पी. बी. पिस्टे, वाणिज्य विभागाच्या डॉ. एम. बी. देसाई, कला विभागाचे डॉ. ए. पी. उबाळे, महाविद्यालयातील विविध विषयाचे प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येंने उपस्थित होते. ह्या व्याख्यानाचे प्रास्ताविक संशोधन कमिटीचे प्रमुख डॉ. के. व्ही. गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. श्यामल हुंबरे यांनी केले. आभारप्रदर्शन डॉ. अर्चना पाटील यांनी केले.

0 9 MAR 2026

जनप्रवास

# विद्यापीठात 'जीएसटी'वर २३ मार्चपासून चर्चासत्र



**जनप्रवास : कोल्हापूर**

"जीएसटी रिफॉर्म्स, डिजीटायझेशन अँड इझ ऑफ डुईंग बिझनेसः मार्चिंग टूवर्ड्स विकसित भारत@२०४७" या विषयावर २३ मार्चपासून दोनदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन विद्यापीठात केले आहे.




शिवाजी विद्यापीठाचा वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभाग आणि भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने हे चर्चासत्र आहे, अशी माहिती अधिविभागाचे प्रमुख डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी दिली आहे.

उद्घाटन सत्रासाठी केंद्रीय जीएसटी व केंद्रीय उत्पादन शुल्क, वडोदरा येथील प्रधान आयुक्त सुरेंद्र मानकोस्कर प्रमुख पाहुणे तर केंद्रीय विद्यापीठ, कर्नाटक येथील डॉ. व्ही. पांडुरंग बीजभाषक आहेत. शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी अध्यक्षस्थानी असतील. या दोन दिवसीय चर्चासत्रामध्ये 'आयसीएआय'च्या केंद्रीय कार्यकारिणीचे सदस्य उमेश शर्मा, धारवाडच्या कर्नाटक विद्यापीठातील डॉ. अंजू ताम्रगुंडी, नामदेव गवस (गोवा), सी. ए. आदित्य सोनटक्के (मुंबई) हे तज्ज्ञ उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. जीएसटी सुधारणा, डिजिटलायझेशन, व्यवसाय सुलभता आणि विकसित भारत @ २०४७ या विषयांवर चर्चासत्रात सखोल चर्चा होणार असून देशभरातील प्राध्यापक, संशोधक, विद्यार्थी तसेच उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञ सहभागी होणार आहेत.

0 9 MAR 2026

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ संघ, श्री स्पोर्टस् विजयी

## सामन्यात अभिजित कोठावळे, मयुर पाटील यांची अर्धशतकी खेळी : कै विलास (मेजर) यादव ट्रॉफी क गट टी २० क्रिकेट स्पर्धा

**जनप्रवास : कोल्हापूर**

शासकीय तंत्रनिकेतनच्या मैदानावर सुरु असलेल्या कोल्हापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने व यादव कुंटुबीय पुरूस्कृत कै. विलास (मेजर) यादव टी २० क गट साखळी क्रिकेट स्पर्धेतील पहिल्या सामन्यात शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघाने पॉप्युलर स्पोर्टस अ संघावर २५ धावांनी विजय मिळविला. तर दुसऱ्या सामन्यात स्पोर्टस असोसिएशन अ संघाने वेद स्पोर्टस ब संघावर ५६ धावांनी मात केली.

शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघ विरुध्द पॉप्युलर स्पोर्टस अ प्रथम फलदांजी करताना शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघाने २० षटकांत ९ बाद





**अभिजित कोठावळे मयुर पाटील**

१५२ धावा केल्या. यामध्ये अभिजित कोठावळे ५०, विशाल हिलगे २५, विक्रम कोंडावळे १८, योगेश दळवी १६, सुखदेव पाटील १३ धावा केल्या. पॉप्युलर स्पोर्टस अ कडून प्रणव निगुंडकरने ४, योगेश चव्हाणने २, अजित अतिग्रे निखील हासुरे व राहुल वाले यांनी प्रत्येकी १ बळी घेतला. उत्तरादाखल खेळताना पॉप्युलर स्पोर्टस अ ने २० षटकांत ९ बाद १२७ धावा केल्या. यामध्ये रोहित धुमाळ ४५, अमित कांबळे १६, वैभव मोडक १४, अजित अतिग्रे १० धावा केल्या. शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघाकडून राज मुपडेने ३, योगेश दळवी वसुखदेव पाटील यांनी प्रत्येकी २ तर दीपक कांबळेने १ बळी घेतला, अशाप्रकारे शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघाने सामना २५ धावांनी जिंकला.

श्री स्पोर्टस असोसिएशन अ विरुद्ध वेद स्पोर्टस ब प्रथम फलदांजी करताना खेळताना स्पोर्टस असोसिएशन अ ने २० षटकांत ८ बाद १९७ धावा केल्या. यामध्ये मयुर पाटील ५५, आदित्य पाटील ३३, सुरज माने २७, विजय घारे २५, वीर देसाई २० धावा केल्या. वेद स्पोर्टसकडून संकेत कौशीकने ३, अनिकेत जाधवने २, आदित्य देवकर व अथर्व खवरेने यांनी प्रत्येकी १ बळी घेतला. उत्तरादाखल खेळताना वेद स्पोर्टस ब ने २० षटकांत ८ बाद १४१ धावा केल्या. यामध्ये योगेश नाईक ३५, अनिकेत नाईक २३, सिध्दांत शिवुडकर २१, अथर्व दिवेकर व उत्तम पाटील नाबाद प्रत्येकी १२ धावा केल्या. श्री स्पोर्टस असोसिएशन अ कडून रविराज कांबळेने २, वीर देसाई, शर्वजीत वारके, तुकाराम कोंडरे व सुनिल चव्हाण यांनी प्रत्येकी १ बळी घेतला, अशाप्रकारे स्पोर्टस असोसिएशन अ ने ५६ धावांनी विजय संपादन केला.

जनसंपर्क कक्ष
0 9 MAR 2026 जनप्रवास शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पोर्ट्रेट, लँडस्केप चित्रकलेविषयी शिवाजी विद्यापीठात कार्यशाळा

**जनप्रवास : कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे दोनदिवसीय चित्रकला कार्यशाळा आज उत्साहात पार पडली. कार्यशाळेचा विषय "पोर्ट्रेट,लँडस्केप अँड कॉम्पोझिशन" असा होता. दळवीज आर्ट्स इन्स्टिट्यूटचे प्रसिद्ध चित्रकार प्रा. अभिजीत कांबळे यांनी विद्यार्थ्यांना चित्रकलेतील बारकावे प्रात्यक्षिकांसह समजावून सांगत मार्गदर्शन केले.

संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाचे सभागृह आणि परिसरात कार्यशाळा झाली. पोर्ट्रेट,लँडस्केप तसेच चित्ररचनेतील संतुलन,रंगसंगती आणि मांडणी याबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनीही मोठ्या उत्साहाने सहभाग घेत विविध प्रकारची चित्रे साकारली. संगीत व नाट्यशास्त्र



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित कार्यशाळेत विद्यार्थ्यांना निसर्गचित्रणाचे प्रात्यक्षिक दाखविताना प्रा. अभिजीत कांबळे.**

अधिविभागाच्या भिंतीवर चित्रकला पदविकेच्या प्रथम व द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी साकारलेले भित्तीचित्र पाहून उपस्थित रसिकांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. यासोबत विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या चित्रांचे चित्रप्रदर्शन देखील आयोजित करण्यात आले. या प्रदर्शनात पोर्ट्रेट,निसर्गचित्रे आणि विविध संकल्पनांवर आधारित चित्रांचा समावेश होता. विद्यार्थ्यांच्या कलाकृतींना उपस्थित कला रसिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला व त्यांच्या सर्जनशीलतेचे कौतुक करण्यात आले.

अधिविभाग प्रमुख डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांच्या मार्गदर्शनाखाली बबन माने, विजय उपाध्ये यांनी समन्वयन केले. प्राचार्य अजेय दळवी, डॉ. मानसिंग टाकळे, चित्रकार विजय टिपुगडे,संग्राम भालकर,सुदर्शन वंडकर,गजानन वाघमारे आदी उपस्थित होते.

0 9 MAR 2026

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



अन्य भाषेतील शब्द एखाद्या भाषेत आले म्हणून तिचे अस्तित्व संपत नसते. या प्रक्रियेला भाषातज्ज्ञ भाषेच्या विकासाची प्रक्रिया म्हणतात. त्यामुळे पश्चिम घाटातील तालुक्यांमधील स्थलांतरणामुळे तेथील बोली भाषा संकटात येतील अशी स्थिती नाही. मात्र, स्थलांतरितांची एक पिढी शहरात वाढल्याने तेथील लोकगीते, लागवडीची गाणी, जात्यावरच्या ओव्या, तेथील वैशिष्ट्यपूर्ण कलाप्रकार याची माहिती असणाऱ्यांची संख्या कमी होईल. यासाठी तेथील लोकजीवनातील या गोष्टींचा अभ्यास आणि संवर्धन होणे अपेक्षित आहे. तसेच पश्चिम घाटातील बोली भाषांचा शास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास होणे गरजेचे आहे.

**- प्रा. डॉ. नंदकुमार मोरे,** मराठी विभाग, शिवाजी विद्यापीठ



स्थलांतरण हे कधी सकारात्मक तर कधी नकारात्मक असते. पश्चिम घाटामधील तालुक्यांमधून होणारे स्थलांतर हे रोजगाराच्या अपरिहार्यतेतून झाले आहे. या स्थलांतरणामुळे शहरात रोजगारासाठी आलेले लोक काहीअंशी आपापल्या गावांमध्ये काही रक्कम खर्च करतात. त्यातून त्या गावांमध्ये थोडी आर्थिक उलाढाल होते. मात्र, त्याचे प्रमाण कमी असते. तरुणांना स्थानिक ठिकाणी सन्मानजनक जीवन जगण्यासाठी शाश्वत रोजगार उपलब्ध झाला तर स्थलांतरण काही प्रमाणात कमी होईल. त्यामुळे शहरांमधील व्यवस्थांवरचा ताणही काही अंशी कमी होतो.

**- प्रा. डॉ. महादेव देशमुख,**
अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ



स्थलांतरणामुळे या तालुक्यामधील शाळांचा पट कमी झाला. या गावांमधील शेती, शेतीपूरक उद्योग यांना मनुष्यबळ उपलब्ध होत नाही. तसेच स्थलांतरणाचा परिणाम लोकपरंपरा, साधनसंपत्ती, लोकजीवन यावरही होत असतो. गावांमधील तरुण मुले, मुली शिक्षणासाठी रोजगारासाठी शहरात गेल्यामुळे गावांमध्ये ज्येष्ठ नागरिक राहतात. दुर्गम भागात रोजगाराच्या संधी कमी असल्याने येथे उत्पन्नही शहराच्या तुलनेत कमी असते. त्यामुळे या गावांमधील युवकांच्या लग्नाचा सामाजिक प्रश्नही तयार होतो. स्थांतरणाचे स्थानिक पातळीवर अनेक सामाजिक परिणाम होतात.

**- प्रा. डॉ. प्रतिभा देसाई,**
समाजशास्त्र विभाग प्रमुख, शिवाजी विद्यापीठ

0 9 MAR 2026
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# क्लिकवर मदत, संकटावर मात; 'निर्भया' सुरक्षेसाठी डिजिटलची साथ!

## शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. उर्मिला पोळ यांनी विकसित केले खास सुरक्षा ॲप

**कोल्हापूर : प्रवीण मस्के**

शिवाजी विद्यापीठ संगणकशास्त्र विभागातील सहयोगी प्राध्यापक डॉ. उर्मिला पोळ यांनी महिलांच्या सुरक्षिततेसाठी खास 'महिला सुरक्षा ॲप' विकसित केले आहे. अँड्रॉइडमधून तयार केलेले हे ॲप 'कोटलीन' या आधुनिक प्रोग्रामिंग भाषेत विकसित करण्यात आले असून संकटाच्या काळात महिलांसाठी डिजिटल सुरक्षा कवच ठरणार आहे.



महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असताना तंत्रज्ञानाच्या मदतीने त्यांना अधिक सुरक्षित करण्यासाठी कोल्हापुरातून एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. 'महिला सुरक्षा ॲप' सोपे आणि वापरण्यास सुलभ इंटरफेसवर आधारित आहे. त्यामुळे कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत वेळ न दवडता याचा वापर करता येतो.



ॲपमध्ये 'इमर्जन्सी कॉन्टॅक्ट्स'ची सुविधा देण्यात आली आहे. युजर हा विश्वासू व्यक्ती किंवा नातेवाईकांचे फोन क्रमांक ॲपमध्ये जतन करू शकतो. संकटाच्या वेळी कोणाला फोन करायचा यासाठी शोधाशोध करावी लागू नये, यासाठी ही सुविधा उपयुक्त ठरणार आहे.

याशिवाय ॲपमध्ये 'शेक टू एसओएस' ही विशेष सुविधा आहे. भिती किंवा घाईच्या प्रसंगी फोन अनलॉक करून बटन दाबणे शक्य नसल्यास केवळ फोन तीन वेळा हलविल्यास (शेक) ॲप आपोआप सक्रिय होते आणि संकटाचा संदेश लोकेशनसह पाठवते. ही सुविधा महिलांसाठी उपयुक्त ठरणार आहे. तसेच ॲपच्या मुख्य स्क्रीनवर पोलिस (१००), आपत्कालीन सेवा (११२) आणि रुग्णवाहिका (१०८) यासारखे महत्त्वाचे हेल्पलाईन क्रमांक देण्यात आले आहेत. त्यामुळे एका क्लिकवर शासकीय यंत्रणेशी संपर्क साधता येणे शक्य होणार आहे.

### 'ग्रीन बटन' दाबल्यास तातडीने संदेश जाणार

महिला सुरक्षा ॲपमध्ये 'ग्रीन बटन' ही खास सुविधा देण्यात आली आहे. महिलेला संकटाची जाणीव होताच हे बटन दाबल्यावर जतन केलेल्या संपर्कांना तातडीने संदेश पाठवला जातो. या संदेशामध्ये महिलेचे लाईव्ह लोकेशन 'गुगल मॅप' लिंकद्वारे पाठवले जाते. त्यामुळे मदत करणाऱ्या व्यक्तींना अचूक ठिकाण समजून त्वरित पोहोचणे शक्य होते.

> तंत्रज्ञानाचा वापर केवळ मनोरंजनापुरता मर्यादित न राहता मानवी सुरक्षिततेसाठी व्हावा, या उद्देशाने हे महिला सुरक्षा ॲप विकसित केले आहे. महिलांना एकट्याने प्रवास करताना किंवा रात्री बाहेर पडताना या ॲपमुळे त्यांना आत्मविश्वास आणि सुरक्षिततेची जाणीव होईल. महिलांच्या सुरक्षेसाठी शैक्षणिक क्षेत्रातून पुढाकार घेत विकसित करण्यात आलेले ॲप महिलांसाठी उपयोगी ठरेल.
>
> **- डॉ. उर्मिला पोळ,**
> सहयोगी प्राध्यापक, संगणकशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ

09 MAR 2026
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांची कर्नाटक, तामिळनाडूला भेट

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या समाजकार्य अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी कर्नाटक आणि तमिळनाडूतील काही महत्त्वाच्या सामाजिक, सेवाभावी संस्थांना भेट देऊन त्यांच्या कार्याची माहिती घेतली.

शिवाजी विद्यापीठाच्या समाजकार्य विषयाच्या विद्यार्थ्यांनी नुकतीच कर्नाटकातील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मेंटल हेल्थ अँड न्यूरोसायन्सेस, बंगळुरू, ओॲसिस इंडिया, कॅडबॅम्स हॉस्पिटल, अक्षयपात्रा फाऊंडेशन, स्टंप शूल अँड सोमप्पा स्प्रिंग्ज प्रा. लि., बंगळुरू, राणे ग्रुप, म्हैसुर, आदिवासी संशोधन केंद्र, म्हैसुर,इत्यादी रुग्णालये, उद्योग समूह आणि स्थानिक सेवाभावी संस्थांना भेटी देऊन तेथील सोयीसुविधांची माहिती घेतली. समाजकार्य अभ्यासक्रमाचे समन्वयक डॉ. उमेश गडेकर, डॉ. उर्मिला दशवंत आणि सौरभ धनवडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही सहल पार पडली.



कोल्हापूर : कर्नाटक राज्य आदिवासी संशोधन केंद्रातील विविध उपक्रमांची माहिती घेताना शिवाजी विद्यापीठाच्या समाजकार्य विषयाचे विद्यार्थी–विद्यार्थिनी.

बंगळुरूमधील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मेंटल हेल्थ अँड न्यूरोसायन्सेस येथे विद्यार्थ्यांनी मानसिक आरोग्य सेवा, आधुनिक निदान पद्धती आणि बहुविद्याशाखीय उपचार प्रणालीचा अभ्यास केला. ओॲसिस इंडिया संस्थेला दिलेल्या भेटीत विद्यार्थ्यांनी बेघर, व्यसनाधीन व्यक्ती आणि रस्त्यावरच्या मुलांसाठी राबविण्यात येणाऱ्या पुनर्वसन कार्यक्रमांची माहिती घेतली. तर, कॅडबॅम्स हॉस्पिटलमध्ये व्यसनमुक्ती उपचार, समुपदेशन आणि दीर्घकालीन पुनर्वसन प्रक्रियेबाबत जाणून घेतले.

म्हैसूर येथील आदिवासी संशोधन केंद्रात विद्यार्थ्यांना आदिवासी संस्कृती, परंपरा आणि विकास धोरणांविषयी माहिती मिळाली. याशिवाय, मनुष्यबळ विकास शिकण्प्रया स्टंप शूल अँड सोमप्पा स्प्रिंग्ज प्रा. लि., बंगळुरू आणि राणे ग्रुप, मैसुरू येथे औद्योगिक व्यवस्थापन, उत्पादन प्रक्रिया आणि मानव संसाधन विकासाच्या पद्धतींचा अभ्यास केला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

09 MAR 2026 जनप्रवास

# विद्यापीठातील 'समाजकार्य' विद्यार्थ्यांची कर्नाटक, तामिळनाडूतील सेवाभावी संस्थांना भेट

जनप्रवास : कोल्हापूर

समाजकार्याच्या अभ्यासामध्ये सैद्धांतिकतेबरोबरच प्रत्यक्ष कार्यानुभवालाही मोठे महत्त्व आहे. ही बाब लक्षात घेऊन शिवाजी विद्यापीठाच्या समाजकार्य अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी कर्नाटक आणि तमिळनाडूतील काही महत्त्वाच्या सामाजिक, सेवाभावी संस्थांना भेट देऊन त्यांच्या कार्याची माहिती घेतली.

शिवाजी विद्यापीठाच्या समाजकार्य विषयाच्या विद्यार्थ्यांनी नुकतीच कर्नाटकातील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मेंटल हेल्थ अँड न्यूरोसायन्सेस, बंगळुरू,ओॲसिस इंडिया, कॅडबेम्स हॉस्पिटल, अक्षयपात्रा फाऊंडेशन, स्टंप शूल अँड सोमप्पा स्प्रिंग्ज प्रा. लि., बंगळुरू, राणे ग्रुप, मैसुरू, आदिवासी संशोधन केंद्र, मैसुरू इत्यादी रुग्णालये, उद्योग समूह आणि स्थानिक सेवाभावी संस्थांना भेटी देऊन तेथील सोयीसुविधांची माहिती घेतली. या अभ्यास सहलीत एकूण ३२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. समाजकार्य अभ्यासक्रमाचे समन्वयक डॉ. उमेश गडेकर, डॉ. उर्मिला दशवंत आणि सौरभ धनवडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही सहल पार पडली.

- सैद्धांतिकतेबरोबरच प्रत्यक्ष कार्यानुभवालाही महत्व
- बेंगळूरु, उटीमधील संस्थेतील भेटीतून नवीन प्रेरणा

बंगळुरूमधील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मेंटल हेल्थ अँड न्यूरोसायन्सेस येथे विद्यार्थ्यांनी मानसिक आरोग्य सेवा, आधुनिक निदान पद्धती आणि बहुविद्याशाखीय उपचार प्रणालीचा अभ्यास केला. समाजकार्य विभागातील अधिकाऱ्यांनी मानसोपचार प्रक्रियेत समाजकार्यकर्त्यांची भूमिका, कुटुंब समुपदेशन, पुनर्वसन आणि समुदाय आधारित मानसिक आरोग्य कार्यक्रमांची माहिती दिली

ओॲसिस इंडिया संस्थेला दिलेल्या भेटीत विद्यार्थ्यांनी बेघर, व्यसनाधीन व्यक्ती आणि रस्त्यावरच्या मुलांसाठी राबविण्यात येणाऱ्या पुनर्वसन कार्यक्रमांची माहिती घेतली. तर, कॅडबेम्स हॉस्पिटलमध्ये व्यसनमुक्ती उपचार, समुपदेशन आणि दीर्घकालीन पुनर्वसन प्रक्रियेबाबत जाणून घेतले. बंगळुरूमधील अक्षयपात्रा फाउंडेशनयेथे विद्यार्थ्यांनी शालेय मध्यान्ह भोजन योजनेच्या अंमलबजावणीतील अत्याधुनिक स्वयंपाकगृह, गुणवत्ता नियंत्रण आणि वितरण व्यवस्थापन प्रणालीचा अभ्यास केला. म्हैसूर येथील आदिवासी संशोधन केंद्रात विद्यार्थ्यांना आदिवासी संस्कृती, परंपरा आणि विकास धोरणांविषयी माहिती मिळाली. याशिवाय, मनुष्यबळ विकास शिकणाऱ्या स्टंप शूल अँड सोमप्पा स्प्रिंग्ज प्रा. लि., बंगळुरू आणि राणे ग्रुप, मैसुरू येथे औद्योगिक व्यवस्थापन, उत्पादन प्रक्रिया आणि मानव संसाधन विकासाच्या पद्धतींचा अभ्यास केला. उटी येथे स्थानिक समुदाय व स्वयंसहायता गटांशी संवाद साधून शाश्वत विकास, पर्यावरण संवर्धन आणि महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाच्या उपक्रमांविषयी माहिती घेतली.

### विविध क्षेत्रांचा अभ्यास

या अभ्यास सहलीत मानसिक आरोग्य, व्यसनमुक्ती, पुनर्वसन, पोषण, आदिवासी विकास, समुदाय संघटन आणि शाश्वत विकास या विविध क्षेत्रांचा विद्यार्थ्यांनी अभ्यास केला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

09 MAR 2026
पुण्यनगरी

# कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगातही ग्रंथालयांचे महत्त्व अबाधित

## डॉ. ज्योती जाधव; शिवाजी विद्यापीठात ग्रंथपालन राष्ट्रीय परिषदेस प्रारंभ

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगामध्येही वाचनाचे, ग्रंथालयांचे महत्त्व अबाधित राहणार असून, कोणतेही तंत्रज्ञान पुस्तकांना पर्याय ठरणार नाही, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी केले.

महाराष्ट्र विद्यापीठे आणि महाविद्यालयीन ग्रंथपाल (मुकला) संघटना, शिवाजी विद्यापीठ शाखा, विद्यापीठाचे बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्र आणि ग्रंथालय व माहितीशास्त्र अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात ग्रंथपालन व्यवसायाचे भवितव्य' या विषयावर आयोजित दोनदिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटक म्हणून त्या बोलत होत्या. मुकला संघटनेचे अध्यक्ष डॉ. मोहन खेरडे अध्यक्षस्थानी होते.

प्र-कुलगुरू डॉ. जाधव म्हणाल्या, ग्रंथालये ही ज्ञानाचे वाहक आणि प्रज्ञेचे निर्माते आहेत. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगातही या मूळ स्रोतांचे महत्त्व अबाधित राहणार आहे; कारण वस्तुनिष्ठ माहितीसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेलाही अंतिमतः ग्रंथांवरच अवलंबून राहावे लागणार आहे.

परिषदेचे संचालक डॉ. एस. ए. एन. इनामदार म्हणाले, ग्रंथालयांनी नेहमीच तंत्रज्ञानातील बदल स्वीकारले आहेत. संगणकाच्या आगमनानंतर ग्रंथालयांचे ऑटोमेशन झाले. इंटरनेटमुळे ग्रंथालये डिजिटल प्रवेशद्वारे बनली. आता कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे स्वयंचलित कॅटलॉगिंग, मेटाडेटा निर्मिती आणि वर्गीकरण ही ग्रंथालयातील नियमित तांत्रिक कामे अधिक जलद आणि अचूक होतील.

अध्यक्षीय मनोगतात डॉ. मोहन खेरडे म्हणाले, ग्रंथालयांचा विकास हेच उद्दिष्ट घेऊन 'मुकला' कार्यरत आहे. ग्रंथपाल हे केवळ प्रशासक नाहीत, तर सेवा पुरवठादार असण्याबरोबर ते शिक्षक आणि संशोधकही आहेत. त्यामुळे ग्रंथालयांना नव्या युगातील संधी आणि आव्हाने यासाठी सक्षम करण्याची जबाबदारी ते निश्चितपणे पेलतील.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. जाधव यांच्या हस्ते एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या महर्षी धोंडो केशव कर्वे ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. विलास जाधव यांना यंदाचा 'मुकला सर्वोत्कृष्ट ग्रंथपाल पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

सुरुवातीला ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस. रंगनाथन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून रोपास पाणी घालून मान्यवरांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन करण्यात आले. डॉ. धनंजय सुतार यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सचिनकुमार पाटील यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. 'मुकला'चे महासचिव डॉ. विनय पाटील यांनी वार्षिक अहवाल सादर केला. एस. डी. हजारे आणि अमृता देसाई यांनी सूत्रसंचालन केले, तर उपग्रंथपाल डॉ. प्रकाश बिलावर यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
0 9 MAR 2026
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत

# एआयच्या युगातही ग्रंथालयांचे महत्त्व अबाधित

## ज्योती जाधव : दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे उदघाटन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगामध्येही वाचनाचे, ग्रंथालयांचे महत्त्व अबाधित राहणार असून कोणतेही तंत्रज्ञान पुस्तकांना पर्याय ठरणार नाही, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी केले.

महाराष्ट्र विद्यापीठे आणि महाविद्यालयीन ग्रंथपाल (मुकला) संघटना, शिवाजी विद्यापीठ शाखा, विद्यापीठाचे बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्र आणि ग्रंथालय व माहितीशास्त्र अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात ग्रंथपालन व्यवसायाचे भवितव्य' या विषयावर आयोजित दोनदिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटक म्हणून त्या बोलत होत्या. मुकला संघटनेचे अध्यक्ष डॉ. मोहन खेरडे अध्यक्षस्थानी होते.



शिवाजी विद्यापीठात ग्रंथपालनविषयक राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन समारंभात डॉ. ज्योती जाधव यांनी मार्गदर्शन केले.

डॉ. जाधव यांनी व्यक्तिगत आयुष्यातील काही उदाहरणे देत ग्रंथालयांचे महत्त्व आपल्या भाषणात विषद केले. परिषदेचे संचालक डॉ. एस.ए.एन. इनामदार, डॉ. मोहन खेरडे यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. जाधव यांच्या हस्ते एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठाच्या महर्षी धोंडो केशव कर्वे ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. विलास जाधव यांना यंदाचा 'मुकला सर्वोत्कृष्ट ग्रंथपाल पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले.

ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ. एस. रंगनाथन यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून आणि रोपास पाणी वाहून मान्यवरांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन करण्यात आले. डॉ. धनंजय सुतार यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सचिनकुमार पाटील यांनी परिचय करून दिला. डॉ. विनय पाटील यांनी वार्षिक अहवाल सादर केला. एस. डी. हजारे आणि अमृता देसाई यांनी सूत्रसंचालन केले. उपग्रंथपाल डॉ. प्रकाश बिलावर यांनी आभार मानले.